# प्रकरण चौथे

# 'जिणं आमुचं' व 'माज्या जल्माची चित्तरकथा' या आत्मकथनांचे, वाङ्मयीनदृष्ट्या मूल्यमापन

# प्रकरण चौथे

# ‘जिणं आमुचं’ व ‘माज्या जल्माची चित्तरकथा’ या आत्मकथनांचे वाङ्मयीनदृष्ट्या मूल्यमापन

४.१ प्रास्ताविक

४.२ आत्मकथनांची शीर्षके

४.३ सामाजिक जाणीव

४.४ सांस्कृतिक जाणीव

४.५ सामाजिक व सांस्कृतिक जाणीव साम्यभेद

४.६ निवेदनशैली

४.७ भाषाशैली

४.८ सारांश

-----

# प्रकरण चौथे

# 'जिणं आमुचं' व 'माज्या जल्माची चित्तरकथा' या आत्मकथनांचे वाङ्मयीनदृष्ट्या मूल्यमापन

## १.१ प्रस्तावना :

या अगोदरच्या प्रकरणात आपण 'माज्या जन्माची चित्तरकथा' व 'जिणं आमुचं' या आत्मकथनांतील सांस्कृतिकतेचा विचार करताना साहित्यातील सांस्कृतिकता, दलित आत्मकथनांतील सांस्कृतिकता व दोन्ही आत्मकथनांतील स्वरूप व विशेष यांचा विचार केला. या दोन्ही आत्मकथनांतील 'सामाजिकता' व 'सांस्कृतिकता' पाहिल्यानंतर या अनुषंगाने या दोन्ही आत्मकथनांची वाङ्मयीनदृष्ट्या गुणवत्ता तपासणे गरजेचे ठरते.

दलित साहित्य हे दलित चळवळीचे एक साधन म्हणून निर्माण झाले असले तरी कलात्मकतेपासून ते दुर्लक्षले गेलेले नाही. विशिष्ट समाजाची प्रतिनिधीक अशी ही कथने शब्दबद्ध करताना व्यक्तिमत्त्वाचा प्रत्यय येत असला तरी खोलवर जाता एका विशिष्ट पीडित समाजाचा शब्दबद्ध हुंदका आहे. म्हणून 'अस्तित्व' व 'अस्मिता' सिद्ध करणारे सामाजिक जाणीव असलेले दलित साहित्य सामाजिकतेच्या व सांस्कृतिकतेच्या दृष्टीने महत्त्वाचे असले तरी त्यातील कलात्मकता दुर्लक्षून चालणार नाही. त्यांची शीर्षके, लेखनरीती, निवेदन समाजजाणीव, सांस्कृतिक जाणीव, भाषाशैली या दृष्टीने या दोन्ही आत्मकथनांची वाङ्मयीन गुणवत्ता तपासणे गरजेचे ठरते. त्या दृष्टीने प्रथमत: या दोन्ही आत्मकथनांच्या शीर्षकाबाबत विचार करू.

## ४.२ आत्मकथनांची शीर्षके :

दलित स्त्रियांच्या आत्मकथनांची शीर्षके अर्थपूर्ण आणि आशयगर्भ आहेत. साहित्यकृतीची शीर्षके आशयासंदर्भात सूचकता प्रकट करीत असताना सूचकता कधी दाद द्यावी इतकी अप्रतिम असते. तर कधी सामान्य स्वरूपाची देखील असू शकते. दलित स्त्रियांच्या आत्मकथनांतील सूचकता उल्लेखनीय आहे. औचित्यपूर्ण आणि मार्मिक शीर्षके साहित्यकृतीची बलस्थाने ठरू शकतात. साहित्यकृतीकडे कसे पहावे याची दिशा प्रदान करू शकतात. त्यादृष्टीने विचार करताना 'शांताबाई कांबळे' व 'बेबी कांबळे' या दोघींच्या आत्मकथनांची शीर्षके महत्त्वाची वाटतात.

प्रथम शांताबाई कांबळे यांच्या 'माज्या जल्माची चित्तरकथा' या आत्मकथनाच्या शीर्षकाच्या विचार करू. हे आत्मकथन अथवा अनुभवकथन करताना लेखिकेने कथेच्या अंगाने लिहिले. पण त्यातही वैशिष्ट्ये असे की ते चित्रकथेच्या रचनाशैलीत लिहिले आहे. 'चित्तरकथा' या शब्दात तसा अर्थगौरव जाणवत नाही. परंतु 'चित्र' या शब्दाचे बोलभाषेतील ते अपभ्रष्ट रूप असावे. 'चित्र' हा शब्दही 'चित्तारणे' या शब्दापासून तयार झालेला आहे. 'चित्र काढणे' अथवा वेड्यावाकड्या रेघोट्या काढणे, असा होतो. लाक्षणिक अर्थाने विचार करताना चातुर्वर्ण्याधिष्ठित समाजव्यवस्थेस अस्पृश्यांच्या वाट्याला 'वेड्यावाकड्या रेघोट्या आल्या. वेड्यावाकड्या रेघोट्या वरवर पाहता नुसती गुंतागुंत वाटते. पण त्या गुंतागुतीतही अनेक आकृतीबंध दडलेले असतात. त्यातूनही काही रेखाचित्रे प्रत्ययाला येतात. शांताबाईंचे रेखाचित्र असेच या गुंतागुंतींच्या रेघोट्यातून आकाराला आले व त्यातूनच एक 'चित्तरकथा' जन्माला आली.

'माज्या जलमाची चित्तरकथा' यातील 'माज्या' या शब्दालाही महत्त्वाचे स्थान आहे. शांताबाई कांबळे यांनी आपली कहाणी सांगत असताना आपल्या अनुभवातून समाजजीवनाचे दर्शन घडविले. त्यांनी स्वतंत्रपणे समाजजीवनाचे वर्णन केले नाही. वर्णव्यवस्थेत जो अन्याय अत्याचार सोसावा लागला, जे दैन्यदारिद्रय भोगावे लागले जी, मानहानी अवहेलना पत्करावी लागली, तिच्या आठवणी झाल्या की, मनाचा क्षोभ होतो. मग अशा प्रक्षोभक अवस्थेत आत्मकहाणी सांगितली तर कळत नकळत हा प्रक्षोभ कहाणीभर निवेदकाची सोबत करीत असतो. अनेक दलित आत्मकथनांत ह्याचा अनुभव येतो. पण शांताबाईंच्या आत्मकथनांत प्रक्षोभ, खवळणं, विद्रोह, आवेश इ. गोष्टींचा प्रत्यय येत नाही. कारण मनाच्या शांत अवस्थेत त्यांनी हे आत्मकथन लिहायला प्रारंभ केला. शांतबाई कांबळे सेवानिवृत्ती झाल्या तेव्हा त्या मनाने शांत व समाधनी होत्या. शांतबाई लिहितात, 'हे सर्व पहून मला फारच आनंद झाला' (पृष्ठ क्र.१५६) सेवानिवृत्तीनंतर शांत अक्षुब्ध मन:स्थितीची एकाअर्थी ही पूर्वसिद्धी होती. 'मी आज बसून विचार करते', (पृष्ठ क्र.१५६) 'आज ही कालवाचक संज्ञा निवृत्तीनंतरच्या काळासंबंधी आहे. मनाच्या आनंदी, तृप्त समाधानी अवस्थेत गतजीवनाचा पट दिसू लागतो. त्या पटावरची अनेक घटनांची प्रसंगाची, व्यक्तींची चित्र स्मरणपटलावर उमटू लागतात आणि तयार होतो एक चित्रपट. चित्रपटातही एक कथानक असते. इथेही शांताबाई कांबळे यांच्या जीवनाची कथा आहे. तिचेच शीर्षक 'माज्या जलमाची चित्तरकथा'.

वर्णव्यवस्थेने वर्षानुवर्षे अन्याय केलेल्या एका विशिष्ट समाजात जन्माला आलेली एका मजुराची मुलगी आपल्या भोवतालच्या समाजात व कुटुंबात संघर्षरत जीवन जगते. पण त्यातूनही जिद्दीने बाहेर पडून आपल्यावरील गुलामगिरीचे जोखड

उतरवून ठेवते. आपल्या व आपल्या कुटुंबाचा विकास घडवून आणवून वर्षानुवर्षाच्या गुहाजीवनाला नकार देते. केवळ दलितच नव्हे तर दलितेतर स्त्रियांनीही आदर्श घ्यावा अशी ही सफल जीवनाची कहाणी 'शांताबाई कांबळे' या दलित स्त्रीची आहे. प्रतिकूल परिस्थितीशी झगडा, वर्तमानाशी तडजोड आणि भविष्याकडे निश्चित वाटचाल या वृत्तीमुळे 'शांताबाई' सगळ्यापेक्षा वेगळ्या ठरल्या. आपण भोगलेले बरे-वाईट क्षण दुसऱ्यांना सांगून मन हलके करण्याची स्वाभाविक वृत्ती मनुष्याची असते. थोडे स्थैर्य, शांतता मिळाल्यावर ही उर्मी अधिकच उफाळून येते. शांताबाईंच्या बाबतीत याचीच प्रचिती येते. त्या अर्थाने जन्म, बालपण, शिक्षण, विवाह, शिक्षण विस्तार अधिकारी पदापर्यंत झेप हा कालानुक्रमपाहिला असता त्यांच्या 'माज्या जल्माची चित्तरकथा' या शीर्षकाची सार्थकता पटते. आता बेबीताई कांबळे यांच्या 'जिणं आमुचं'ची शीर्षक विशेषत: लक्षात घेऊया.

'जिणं आमुचं' - दलित आत्मकथने ही मराठी सारस्वतातील भूषणावह घटना म्हणून ओळखली जाते. ही आत्मकथने माणूसपण नाकारलेल्या, झिडकारलेल्या,गावाबाहेर ठेवलेल्या, अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या माणसांचीच आहेत. माणसानेच माणसांवर केलेल्या लांच्छनास्पद अनुभवांचा कबुलीजबाब म्हणजे दलित आत्मकथन होय. त्यामुळेच शीर्षकापासूनच दलित आत्मकथनांत विद्रोह, वेदना व नकार दिसतो. 'जिणं आमुचं' या बेबीताईंच्या आत्मकथनांतील शीर्षकातच 'सामूहिकता' आहे. पन्नास वर्षापूर्वीच्या पश्चिम महाराष्ट्रातील महार समाजाचे व प्रामुख्याने महार समाजातील स्त्रीजीवनाचे चित्रण हा या पुस्तकाचा मुख्य हेतू आहे. 'स्व'पेक्षा 'आम्ही' ची जाणीव प्रबळ असलेली शीर्षकापासूनच

लक्षात येते. त्युळे 'स्वचित्रणाला' अल्प स्थान बेबीताईंनी दिले आहे. आपल्या समूहाची वेदना मांडून पांढरपेशासमाजाला हादरा देण्याचा मानस असल्यामुळे अगदी लाजिरवाण्या, किळसवाण्या, घृणास्पद गोष्टीही बेबीताईंनी नि:संकोचपणे मांडल्या. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दलित समाजाचे केलेले परिवर्तन आणि आजच्या महार समाजाला डॉ. बाबासाहेबांच्या कर्तृत्वाचे झालेले विस्मरण यांची खंतही लेखिकेला जावणते म्हणून हे आत्मलेखन स्वकेंद्री नसून समष्टीकेंद्री ठरले आहे. म्हणून या लेखनात आत्मचरित्राचा भाग नाममात्र असून समाजजीवनाचे चित्रण प्रमुख आहे.

पन्नास वर्षापूर्वी दलित स्त्रीचे जीवन एकमेकींपासून वेगळे नव्हते. प्रत्येकीचे शारीरिक, मानसिक स्तरावर शोषण होत होते व प्रत्येक स्त्री रूढीग्रस्त जीवनाची बळी ठरली होती. ह्या स्त्रीचे जीवन विस्तारणे हा प्रमुख हेतू असल्यामुळे 'मी' चे चित्रण पाठी राहीले आहे. एकंदरीत दलित स्वकथनातील नायक-नायिका प्रस्थापित समाजाविरूद्ध बंड करून उठलेले असतात. बेबीताईंही याला अपवाद नाहीत. म्हणून त्यांचे 'जिणं' त्या आवेशपूर्णतेने चितारतात. 'स्व'ला इथे दुय्यम स्थान असल्यामुळे 'आम्ही'चे चित्रण बेबीताई फार बारकाईने करतात. समूहाच्या वेदना, आम्हीची वेदना इतकी प्रबळ असल्यामुळेच असेल कदाचित पण त्यांच्याविषयी फार अल्प माहिती मिळते. याउलट त्यांच्या समाजातील अंधश्रद्धा, रूढी, तराळकी-येसकरकी, पेतराज सोडणे, आषाढातील सण, देवऋषी या भ्रामक व परंपरागत रूढींविषयी त्यांनी अधिक तपशीलवार लिहिले आहे व त्यानंतर ज्या महामानवामुळे दलितांचे जीवन आमूलाग्र बदलले त्यांच्या चळवळभंचा संदर्भ, त्यांच्या सभेचा परिणाम, वृत्तपत्रे आंदोलने यामधून किशोरवयीन दलितांची जडणघडण कशी होत

होती. तसेच धम्मदिक्षा, धर्मांतर, काळाराम मंदीराचा सत्याग्रह इ. चे उल्लेखही त्यांनी कले आहेत. त्यांच्यामुळे त्यांच्या स्वकथनाच्या कलात्मकतेला कुठेही बाधा आल्यासारखे वाटत नाही. कारण शून्यात उभा असलेला समाज व त्यांना बाहेर काढणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याविषयी वाचकांच्या मनातही आदरांची भावना निर्माण होते. हेच या स्वकथनाचे यश आहे.

'जिणं आमुचं' मधील स्त्री उच्चवर्णीय समाजाकडून धिक्कारली गेली होती व स्वसमाजाकडून पिळली गेली होती. तिचे समाज व कुटुंब व्यवस्थेत स्थान दुय्यम होते. सवर्ण स्त्रीचा तिच्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन जातिभाराने दूषित आहे. दरिद्री जीवनाचे आणि भुकेकंगाल अवस्थेचे अनेक चटका लावणारे प्रसंग त्यांनी चितारले आहेत. स्त्रीचा जन्मजात स्वभाव असतो तो म्हणजे 'व्यक्तिगत दु:खाचे भांडवल न करणे'. तो स्वभाव बेबीताईंचा आहे. म्हणून तुरळक प्रसंग सोडता संपूर्ण आत्मकथनभर 'आम्ही'ची वेदना आपला पाठपुरावा करते. दलित आत्मकथनांतील 'समूहनिष्ठा' हे प्रत्येक दलित आत्मकथनांतील 'यश' असते. 'जिणं आमुचं' हे एका समूहाच्या जीवनानुभवांचे सुसंघटित ठिकाण आहे. त्याचप्रमाणे सामाजिक, सांस्कृतिक नीती संकेत, आदर्श इत्यादी घटकांचे ते भावोत्कट आविष्करण आहे. केवळ एका व्यक्तीची जीवन कहाणी मांडणे हा हेतू नसून स्वसमाजाच्या दु:खाचा पाढा वाचणे हा व्यापक हेतू त्यात आहे. त्या अर्थाने विचार करता 'जिणं आमुचं' हे शीर्षक योग्य वाटते.

बेबीताईंच्या यासमाजातील समूहवेदनेच्या प्रकटीकरणामुळेच मराठी साहित्यविश्व एका अनोख्या विश्वातील अनेक आंदोलनाला सामोरे गेले. त्या आंदोलनातील आम्हीपणाच्या भावनेने एका दुर्लक्षित जगाला सामोरे येण्याचीसंधी

मिळाली याचे श्रेय बेबीताईंना फार मोठे जाते. एका दुर्लक्षित समूहातील स्त्रीची येथपर्यंतची झेप म्हणजे आंबेडकरी चळवळीचे यश आहे.

## ४.३ सामाजिक जाणीव :

दलित लेखकांच्या एकूणच साहित्यामागे तीव्र सामाजिक जाणीव आढळून येते. प्रत्येक मानवाला स्वातंत्र्य, प्रतिष्ठा आणि नीतिमूल्य सुरक्षितता मिळाली पहिजे अशा भूमिकेवरून निर्माण झालेली एक जीवनदृष्टी वाङ्मयात निर्माण होत आहे. या दृष्टिकोणालाच दलित जाणीव म्हटले जाते. ही दलित जाणीव माणसाला, मूल्यांना प्राधान्य देणारी आहे. परिवर्तनवादी आणि समाजकेंद्री आहे. ही जाणीव म्हणजे सामाजिक जाणीव होय. कारण दलित जाणीव ही विशिष्ट समाजाशी बांधिल आहे. विशिष्ट समष्टीची ती जाणीव आहे. एकंदरीत ही जाणीव समाजनिष्ठ आहे व म्हणूनच दलित जाणीव म्हणजे पर्यायाने सामाजिक जाणीव होय. जेव्हा लेखक आपल्या भावानुभवाचा शोध व्यक्तिगत पातळीवर घेतो तेव्हा या अनुभवांना सामाजिक जाणिवेंची पार्श्वभूमी असते. दलित स्वकथनेही याला अपवाद नाही. या स्वकथनांमधून येणारा 'मी' हा केंद्रस्थानी नसून केवळ निमित्तमात्र आहे. म्हणून प्रत्येक स्वकथनात 'मी' ऐवजी 'आम्ही' चा नाद ऐकू येतो. हीच सामाजिक जाणीव 'माज्या जल्माची चित्तरकथा'मधील सामाजिक जाणीव होय.

'माज्या जल्माची चित्तरकथा' ही एका कर्तृत्ववान स्त्रीच्या जीवनसाफल्याची कहाणी आहे. शिकण्यासाठी शाळेत नाव घालण्यापासून शिक्षण नोकरी, विवाह, वैवाहिक जीवनातील वादळ, वैवाहिक जीवनातील तडजोड, शिक्षणक्षेत्रात शिक्षण विस्तार अधिकारपदापर्यंत यशस्वी वाटचाल, सेवानिवृत्ती, मुलांचे शिक्षण-नोकरी इत्यादीपर्यंतच्या प्रवासाचे चित्रण शांताबाईंनी केले आहे. परंतु केवळ आपल्या

कर्तृत्त्वशाली आयुष्याचा चित्रपट उभा करणे असा हेतू लेखिकेचा नाही तर या निमित्ताने आपल्या समाज आणि या समाजातील दारिद्र्य, दु:ख, समज-अपसमज, श्रद्धा, अंधश्रद्धा आणि काळाच्या ओघात आलेले परिवर्तने झालेले धर्मांतर, शिक्षणामुळे बदललेली पिढी आणि दारिद्र्यामुळे, परिस्थितीमुळे न शिकू शकलेली यांचे नुसते दर्शन घडते असे नव्हे, तर या दोन पिढ्यांमध्ये पडलेले आर्थिक सामाजिक, मानसिक अंतरही लेखिका दाखवू इच्छिते. कारण लेखिका केवळ स्वत:च्या सुखदु:खात रममाण होणारी, त्यालाच कवटाळीत गोंजारीत बसणारी नाही. स्वत:च्या उन्नयनाबरोबरच आपल्या गरीब अज्ञानी समाजाचेही उन्नयन व्हावे त्याचा उत्कर्ष व्हावा, पिढ्यानुपिढ्या सामाजिक गुलामगिरीत आणि दु:खाच्या खाईत खितपत पडलेल्या समाज वर यावा यासाठी तळमळणाऱ्या मनाने हे केलेले लेखन आहे.

त्यांच्या आत्मकथनाला इतर दलित आत्मकथनांप्रमाणे सामाजिक जीवनाचा संदर्भ आहे. त्याचप्रमाणे सामूहिक जीवनाचा संदर्भ आहे. परंतु बहुतांशी आत्मकथन व्यक्तीकेंद्री असल्यामुळे लेखिकेने समाजदर्शनापेक्षा सामाजिक पर्यावरणात घडत गेलेल्या व्यक्तिदर्शनावर अधिक भर दिला आहे. ज्या समाजातील स्त्रीला संघर्षाचा मार्गही माहीत नव्हता आणि अप्रतिकाराची भूमिका घेऊन तिला प्रवाहपतीताप्रमाणे जगावे लागत होते त्याच समाजातील एक स्त्री शांततापूर्ण प्रतिकाराचा मार्ग स्वीकारते आणि अभ्युदयाच्या संधीचा लाभ घेते ही संधी डॉ. बाबासहोब आंबेडकरांच्या दलित चळवळीमुळे मिळू लागली होती. यांचे प्रत्यंतर शांताबाईंचे आत्मकथन वाचले की लक्षात येते. एका मजुराची सातवीपर्यंत शिकलेली मुलगी शिक्षण विस्तार अधिकारी म्हणून निवृत्त होते ही घटनाच लक्ष्यवेधी होती.

शिक्षणामुळे माणसात काय बदल होऊ शकतो आणि सामाजिक परिवर्तनास माणसाचे कार्य कर्तृत्व कसे प्रेरक ठरू शकते हे शांताबाई कांबळे यांच्या व्यक्तित्त्व व कर्तृत्वावरून लक्षात येते. शांताबाईंचा पूर्वार्ध प्रत्यक्ष आंबेडकर युगात (१२२३ ते १९५६) व उत्तरार्ध (१९५६ नंतर) आंबेडकरोत्तर युगात येतो. १९५७ मध्ये करगणी येथे धर्मांतराचा सोहळा झाला. त्या सोहळ्यात लेखिकेनेही बौद्ध धर्माची दिक्षा घेतली. म्हणजेच पूर्वार्धातील जे अनुभव आहेत ते महार म्हणून घेतलेले आहेत व उत्तरार्धातले अनुभव नवबौद्ध म्हणून आहेत. त्युळे समाजव्यवस्थेतील बदल, त्यांनी टिपले आहेत. त्यातील फरक काही उदाहरणांवरून लक्षात येतो.

ज्या सवर्ण मानसिकतेने दलितांना 'अस्पृश्य' म्हणून हिणवले त्यांना त्यांच्या मुलभूत हक्कांपासून वंचित ठेवले. त्याच दलितांना शिक्षणाचा मार्ग मिळाल्यावर, आत्मभान आल्यावर त्यांनी प्रस्थापित समाजव्यवस्थेला नकार द्यायला सुरूवात केली. त्यांची उदाहरणेही शांताबाईंच्या आत्मकथनांत आढळतात. उदाहरणार्थ दलितांना बांगड्या भरायला नकार दिलेल्या सवर्ण बाईवर बहि:ष्कार टाकणे, सवर्णांनी विहिरीवर पाणी भरायला फौजदारी दाखल करणे. मुलीला अस्पृश्याची वागणूक मिळाल्यावर शांतपणे तिला समजावणे या घटना पाहिल्या असता लक्षात येते की, त्यांच्याही मनात सवर्णाविषयी असंतोष होता पण त्यांनी त्याचा प्रतिकार शांततेने व सनदशीर मार्गाने केला. लहानपणी त्यांना जे अस्पृश्यतेचे चटके सोसावे लागले तेच मोठेपणीही लागले एवढेच काय पण त्यांच्या मलांनाही अस्पृश्यतेचे चटके बसले. पण त्याविषयी संताप, प्रक्षोभ, विद्रोह याचा लवलेशही त्यांच्या स्वभावात दिसत नाही. प्रत्येक घटनेचे त्यांनी अतिशय अलिप्तपणे व तटस्थपणे चित्रण कले आहे. कारण शांताबाईंना काळाचा इतिहास किंवा काळाचे चरित्र

सांगायचे नव्हते. तर 'स्व' आठवणीतून येणाऱ्या प्रासंगिक घटनांचे चित्रण करायचे होते. त्यामुळे 'सामुहिक वेदना' त्यांच्या स्वकथनात आठवणींच्या ओघात येते. सामाजिक जाणीवेचे भान त्यांना नव्हते असे म्हणता येणार नाही. पण इतर दलित आत्मकथनांत 'मी' हा समाजाचा प्रतिनिधी म्हणून एका अर्थी सामूहिक असतो. या सामूहिकतेच्या जाणिवेने पुष्कळदा कथनाचे केंद्र सामूहिक अनुभवाकडे सरकते व आठवणीतील एकसंघपणा संगतो. म्हणून बहुतांशी दलित आत्मकथनांत एकप्रकारची अपूर्णता जाणवते. शांताबाईंच्या लेखनात ही अपूर्णता जाणवत नाही. कारण ही त्यांच्या आयुष्याच्या शेवटाची इतिकर्तव्यतेची कहाणी आहे. त्यादृष्टीने विचार करता बेबीताईंच्या लेखनात ही जाणीव प्रबळ दिसते. बेबीताईंनी वैयक्तिकतेपेक्षा सामाजिकतेवर भर दिल्यामुळे ही जाणीव प्रखर वाटते.

### 'जिणं आमुचं' मधील सामाजिक जाणीव :

दलित स्त्रियांच्या आत्मकथनांतून दलितांच्या सामाजिकतेचे, संस्कृतीचे, इतिहासाचे, शिक्षणाचे, नैतिकतेचे दर्शन होते. वाङ्मयीन दृष्टीने विचार करता त्यातून सामाजिकतेचे चित्रण तर होतेच पण त्यातील अनेक गोष्टीही दृग्गोचर होतात. सामाजिक दुरावस्था तर प्रत्येक आत्मकथनांत दिसते. दति आत्मकथनांतील स्त्री असो वा पुरूष अनेक पातळ्यावर संघर्षरत दिसतो. सांस्कृतिक व सामाजिक अध:पतनामुळे त्यांची लढाई भिन्न भिन्न स्तरावर चालू असते. गावगाड्यातील स्थानामुळे येथील अस्पृश्य नेहमीच अधोन्मुख राहिला. त्यांचे दु:ख व वेदनाही त्याच्यासारखी 'अस्पृश्य' राहिली. म्हणूनच दलित आत्मकथनांत पुन:प्रलयाचा आनंद मनाला विरंगुळा, जगण्याचे सार्थक एखादी प्रयोजने असत नाहीत. तर ज्या व्यवस्थेने आपल्यावर हे जिणे लादले त्याविषयी नकार नोंदविणे हे प्रयोजन असते.

बेबी कांबळे यांचे आत्मकथन यादृष्टीने महत्त्वाचे वाटते. एक तर ते इतर दलित आत्मकथनांच्या तुलनेत वेगळे आहे. कारण या आत्मकथनांतून त्यांच्या वैयक्तिक जीवनावर प्रकाश पडण्याऐवजी त्यांच्या समाजाविषयीच अधिक माहिती मिळते. याचे कारण की लेखिकेच्या स्वत:च्या व्यक्तिगत जीवनाविषयी फारसे सांगणे महत्त्वाचे वाटत नाही. तर आपण जगलेल्या आयुष्याच्या निमित्ताने आपल्या समाजाचे सर्वांगीण चित्र रेखाटणे तिला जास्त महत्त्वाचे वाटते. म्हणूनच बेबीताईंच्या जन्मापासून ते या आत्मकथन लेखनकष्टातील त्यांचा समाज आणि त्या समाजात डॉ. बाबासाहेबांच्या उदयानंतर आलेली परिवर्तने त्यांचा परिणाम, डॉ. बाबासाहेबांच्या पश्चातचा समाज यांचेही चित्र या आत्मकथनांत उमटलेले दिसते. बेबी कांबळे आपल्या आत्मकथन लेखनामागील भूमिका स्पष्ट करतात. त्यांना पन्नास वर्षापूर्वी आपला समाज कोणत्या गुलामगिरीच्या जोखडात होता हे आजच्या पिढीला दाखवून द्यायचे होते व सवर्णांच्या मानसिकतेवरही ताशेरे ओढायचे होते. म्हणूनच मध्येच एकप्रकारचा विद्रोही सूर आळवताना बेबीताई दिसतात. लेखिकेने समाजजीवन आणि येथील समाजव्यवस्थेविषयी केलेले चिंतन, मधूनमधून केलेले भाष्य व आपल्या समाजाविषयीची कणव व्यक्त केली आहे. काहीवेळा त्यांचा स्वर चढाईचा दिसतो. ''अहो तुमच्या वैभवाचा उपभोगच मुळी महाराच्या हाडामासाच्या, रक्ताघामाच्या रसाचा आहे.'' सरपण तोडताना म्हारणीचा घाम न् घाम त्या लाकडावर पडलेला असतो. तो सवर्णांना चालतो पण बाहेरून पडलेला दोरा किंवा स्पर्श चालत नसे. ह्या सवर्णांच्या दांभिक मानसिकतेवर त्या हल्ला करतात. अज्ञान अस्पृश्यतेमुळे दलितांच्या हजारो पिढ्यांची माती झाली पण आता डॉ. बाबासाहेब आंबेडकरांमुळे नवजीवन मिळालेल्या दलित आपल्यावरील

अन्यायाचे खंडन करू लागला. त्याविषयी त्यांची भाषा त्वेषाची हाते. संपूर्ण लेखनामधून त्यांनी समाजाची जी अवस्था रेखाटली आहे ती वाचकांना अंतर्मुख करायला लावणारी आहे. दारिद्रयाच्या गर्तेत जीवन कंठणारी, अज्ञानाच्या घोर अंधारात गटांगळ्या खाणारी आपली माणसे जागृत व्हावीत. पुढच्या पिढीला तर आपल्यासारखे भीषण जीणे जगावे लागू नेय याची त्यांना तळमळ आहे. म्हणून ही अवस्था ज्यांनी लादली त्या सवर्णांविषयी त्यांच्या मनता खदखदता संताप आहे.

'पोटभर पाणी व चतकोर भाकरी' या क्षुल्लक गरजांसाठीही सवर्णांनी दलितांना नाडवले. या विषयीची विद्रोही भावना इतर दलित आत्मकथनांप्रमाणे बेबीताईंच्याा लेखनातही दिसते. पंरतु इतर आत्मकथनांत अभावाने आढळणारी एक गोष्ट त्यांच्या आत्मकथनांत आढळते ती म्हणजे, सवर्णांबरोबर आपल्या समाजाचीही कानउघाडणी करतात. कारण ज्या सवर्णांच्या मक्तेदारी डॉ.बाबासाहेबांच्या चळवळीने मोडून काढली. तिचीच गुलामगिरी काही लोक करू लागले आहेत. नवबौद्ध झाल्यावरही पून: उपासतापास, देवधर्म करू लागले आहेत. याविषयी चीड त्या व्यक्त करतात. या अर्थाने विचार करता बेबीताईंच्या लेखनात सामाजिक जाणीव दिसून येते. यातील आशयाची ही जाणीव एकरूप झालेली दिसते. उगीचच विद्रोह व नकार न दिसता प्रसंगाच्या अनुषंगाने बेबीताईंची लेखणी धारदार झालेली दिसते. राजकीय उलथापालथीविरूद्ध कोणतीही प्रत्यक्ष कृती करणे शक्य नसते तेव्हा त्यांची भावनात्मक व विचारात्मक स्पंदने साहित्यातून प्रकट होतात. बेबीताईंच्या बाबतीत तेच दिसून येते. प्रस्थापित समाजाविरूद्ध त्यांनी वापरलेली धारदार लेखणी हे आंबेडकरी तत्त्वविचारांचे यश म्हणता येईल. ही दलित जाणीव किंवा सामाजिक जाणीव दलितांच्या मनात जागृत होण्यामागे फुले-आंबेडकर

विचारसरणी महत्त्वाची ठरल्यामुळे त्याविषयीची कृतज्ञता बेबीताईंनी जागोजागी व्यक्त केली आहे.

## ४.४ सांस्कृतिक जाणीव :

दलित जीवनाची सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक आणि अन्य साऱ्याच बाजूने शोषण केले गेले. 'माणूस' म्हणून जगण्याचे सारे हक्कच नाकारले गेले. या अनुभवांना अक्षरबद्ध करणारे आणि डॉ. आंबेडकरांना अभिप्रेत असणारे सम्यक क्रांतीचे सूत्र मांडत दलित साहित्य निर्माण झाले. त्यादृष्टीने दलित साहित्य ही एक सामाजिक व सांस्कृतिक घटना आहे. एखाद्या समाजाची आपण संस्कृती असे म्हणतो तेव्हा त्या समाजाच्या लोकजीवन प्रभावित करणाऱ्या त्याच्या चालीरीती, त्यांच्या प्रथा, परंपरा त्यांचे भाषाव्यवहार, श्रद्धा-अंधश्रद्धा, समज-गैरसमज आदी भाग त्यात येतो. दलितांच्या बाबत विचार केला असता आपल्या असे लक्षात येते. दलितांच्या यातनामय जिण्यामध्ये या संस्कृतीचा फार मोठा हातभार आहे. कारण अज्ञानापायी, भोळसट धर्मकल्पनेपायी हा समाज वर्षानुवर्षे विशिष्ट वर्गाकडून अन्यायग्रस्त झाला. त्याचे चित्रण प्रत्येक दलित आत्मकथनांत दिसते. दोन्ही 'कांबळेबाईंच्या'आत्मकथनांत याचा प्रत्यय येतो.

### 'माज्या जल्माची चित्तरकथा : सांस्कृतिक जाणीव' :

शांताबाईंनी आपले आत्मकथन 'आत्मकथन' या पठडीत सुयोग्यरितीने बसवल्यामुळे त्यांच्या आत्मलेखनात बालपण ते वृद्धत्त्व हा कालखंड सुयोग्य रितीने आलेला दिसतो. त्यांनी आपल्या बालपणापासूनच्या आठवणींपासून सुरूवात करून शेवट आपल्या 'नातू होण्याच्या' शेवटच्या टप्प्यावर केला आहे. हे अनुभवकथन करत असताना त्यांनी आजुबाजूच्या समाजाचे व त्यातील

व्यक्तिदर्शनाचे चित्रण केले आहे. त्या अनुषंगाने त्यांनी दलित सामजाची संस्कृती संदर्भासहीत वापरली आहे. म्हणजे दलितांच्या विवाहपद्धतीची माहिती न देता त्यांच्यावेळी झालेली विवाहविधीची समग्र माहिती त्यांनी दिली. पुरूषप्रधान संस्कृतीचे त्यांना आलेले अनुभवही त्यांनी त्या अनुषंगाने लिहिले. त्यावेळी विवाहाच्यावेळी मुलीची पसंती नापसंती विचारात घेतली जात नसे. विवाह मोठी माणसे परस्पर ठरवत असत. याची माहिती शांताबाईंचा विवाह परस्पर ठरवल्यावर आपल्या लक्षात येते. अशा अनेक रूढी परंपराची माहिती त्या आठवणींच्या ओघात सांगतात.

येस्करकी, महाराच्या सणांची, जत्राप्रसंगाची देवधर्मांची माहिती त्यातून मिळते. मुलं होण्यासाठी, मुलं जगण्यासाठी येथे नवस केला जातो. कुठल्याही आजारावर देवऋषींचा उपाय केला जातो. अंगारे-धुपारे, नैवेद्य याप्रकारच्या कल्पना येथे पाळल्या जातात. स्वत: लेखिकोही मूलं जगण्यासाठी नवस करते. दलितांच्या जीवनात विशेष काही घडामोडी नसल्यामुळे सवर्णांची सेवा करणे हेच कर्तृत्व त्यांचे होते. परंपरेने त्यांच्यावर ते लादले होते व शिक्षण नसल्यामुळे वर्षानुवर्षे अज्ञानात दलित त्यांच्या परंपरांचे पालनही करत होते. जनजागृती घडून येईपर्यंत त्यात काहीही बदल नव्हता. भोळसटपणामुळे स्त्रियांकडून त्यांचे पालन मोठ्या प्रमाणावर होत होते. परंतु धम्मदीक्षा घेतल्यावर सवर्ण आणि नवबौद्ध यांच्यात संघर्ष होऊ लागले. धर्मांतरासारखी सांस्कृतिक घटना दलितांचे अवघे जीवन बदलायला कारणीभूत ठरली. यांचे संदर्भही शांताबाईंच्या लेखनात आढळतात. शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही हे लक्षात आल्यावर प्रतिकूल परिस्थितीतही लेखिका शिकली म्हणून ती सवर्णांची मक्तेदारी असलेल्या

शिक्षणक्षेत्रात मानाचे स्थान मिळवू शकली. पण लेखिकेच्या बरोबरीच्या तिच्या मैत्रिणी या शिक्षण न घेतल्यामुळे त्यात दास्यात जीवन जगत होत्या. त्यानी आपली सांस्कृतिक गुलामगिरी मोडून काढली नाही. लेखिकेने आपल्यापुरते ते जोखड उतरवले. म्हणून ती यशस्वी झाली. म्हणून आत्मकथनाची सुरूवात लेखिका तिचे नाव शाळेत घालण्याच्या प्रसंगापासून करते व शेवटही शैक्षणिक क्षेत्रात तिने केलेल्या उच्च कामगिरीने करते.

स्वआठवणींना उजाळा देणे, गतआयुष्याविषयी सिंहावलोकन करणे हा शांतबाईंचा हेतू असल्यामुळे त्यांच्याविषयीचा प्रत्येक टप्प्यावरील परिवर्तने त्यांनी लिहिली आहेत. पण धर्मांतर, नवबौद्ध म्हणून मिळालेली ओळख, वर्षानुवर्षाच्या महारांच्या चालत आलेल्या परंपरा, ती पाळण्याची दलितांची मानसिकता, येथील स्त्रियांची परंपरा पालनाची मानसिकता इ. सांस्कृतिक जाणिवांची स्पंदने स्वतंत्रपणे त्यांनी विशद केली नाही तर आपल्या कहाणीच्या अंगाने त्यांचे केवळ संदर्भ सांगितले. ''मुलाला लगेच आंबेडकर कॉलेजवर प्राध्यापक म्हणून घेतले. तो सांगलीपासूनच समाजकार्य करत होता आता तो पँथरचे काम करतो.'' या ओझरत्या उल्लेखाखेरीज कोणत्याही सामाजिक सांस्कृतिक चळवळींचे, संघर्षाचे, परिवर्तनाचे उल्लेख आत्मकहाणीत येत नाहीत. इतर आत्मकथनांत आठवणारी सामाजिक व सांस्कृतिक जाणीव लेखिकेच्या आत्मकहाणीत प्रबळपणे दिसत नाही. तिला तिच्या 'जल्माची चित्तरकथा' सांगायची असल्यामुळे दलित समाजाच्या रूढी-परंपरा, अंधश्रद्धा यांचा उल्लेख नाममात्र आढळतो. परंपरेविरूद्ध, संस्कृतीविरूद्ध बंड करूनही एक प्रेमळ, शोशिक व समंजस, स्त्रीसुलभ व्यक्तिमत्त्व जया आत्मकथनाच्या निमित्ताने आपल्याला अनुभवायला मिळते.

**'जिणं आमुचं' मधील सांस्कृतिक जाणीव :**

दलित समाजातील रूढी परंपरा, संस्कृती यांचा तपशील प्रत्येक दलित आत्मकथनांत सापडतो. कारण दलित जीवनाचा तो एक अविभाज्य घटक होता. वर्णव्यवस्थेच्या वरवंट्याखाली दबल्या गेल्यामुळे अज्ञानी दलित समाज अंधश्रद्धेखाली जखडला गेला होता. या अंधश्रद्धेपायी तो परंपरा पालनांचा गुलाम झाला होता. अनेक दलित कुटुंब याच अज्ञानापायी आपला विकास करू शकत नव्हती. बेबीताईंनी पन्नास वर्षापूर्वीचे, धर्मांतरापूर्वीचे दलितांचे पशुवत जगणे निर्भिडपणे या आत्मकथनाच्याद्वारे मांडले. म्हणून कलात्मकतेपेक्षा सांस्कृतिक व सामाजिक दृष्ट्या या आत्मकथनाचे महत्त्व आपल्याला दिसून येते. एका संस्कृतीच्या अभ्यासकाने केलेल्या चिकित्सेसारखी मार्मिक चित्रणे यात दिसून येतात. महार समाजातील बारीक-सारीक तपशील त्यांनी एखाद्या समाजशास्त्रज्ञासारखे विवरण करून दाखवले आहेत. दलित स्त्रीजीवनाबरोबर दलित जीवनाचा एवढा काटेकोर अभ्यास इतर आत्मकथनांत अभवानेच आढळतो.

प्रत्येक समाजात ज्या रूढी-परंपरा असतात त्यांच्यामुळेच त्या समाजाची ओळख इतर समाजांना होत असते. अठराविश्व दारिद्रयाने गांजलेल्या या महार समाजातील घरदार, विविध प्रथा, विवाह, नवस सायास, अंगारेधुपारे, लग्नविधी, पोतराज, मुरळी सोडण्याच्या प्रथा, रेडेजतरा प्रसंग इ. सांस्कृतिक संदर्भ बेबीताईंनी सांगितले आहेत. महाराच्या घरांचे वर्णनही त्यांनी अगदी तपशीलवार केले आहे. या घरात ना भांडीकुंडी ना कपडालत्ता आहे ते फक्त अठराविश्व दारिद्रय इ. या दरिद्रयाच्या सोबतीला आहेत. भूक,उपासमार, दैन्य, कौटुंबिक कलह यातही आयुष्य कंठणारी दलित स्त्रिया मुलं यांचेही वर्णन बेबीताई करतात. वर्षभर आंघोळ

नाही, पोटभर अन्न नाही व अंगभर कपडा नाही. भीक मिळालेले अन्नही कुजक, नासक, भयंकर अस्वच्छता असे ओंगळवाणे व घृणास्पद जीवन बेबीताईंनी फार जवळून पाहिले. त्यामुळेच त्याचे संदर्भ त्यांनी आपल्या लेखनात घेतलते. आत्मप्रौढीपेक्षा त्यांना आपल्या समाजाचे दु:ख मांडणे गरजेचे वाटले म्हणूनच स्वविषयी अगदी अल्पप्रमाणात त्यांनी लिहिले.

'पड'या प्रत्येक दलित आत्मकथेत आढळणाऱ्या सांस्कृतिक संदर्भाचा उल्लेख त्यांच्याही आत्मकथनांत आढळतो. भूक मागण्यासाठी दलितांनी स्विकारलेला तो मार्ग होता. त्यांची मानसिकता बेबीताईंना सांगणे महत्त्वाचे वाटते. नुसते अनुभवकथन करून बेबीताई थांबत नाहीत तर दलितांच्या अन्यायाला कारणीभूत असलेले सामाजिक व सांस्कृतिक संदर्भ त्या चिकित्सक वृत्तीने विशद करतात. पोतराज सोडल्याची पद्धत असूदे किंवा तराळकीची पद्धत असूदे त्याविषयी बेबीताई समग्र माहिती देतात. उदाहरणार्थ, आषाढातील पहिल्या मंगळवारी ह्या मुलाला विशिष्ठ प्रकारचे कपडे घातलते जातात. पोतराजाच्या सगळ्या पद्धती म्हणजे वाकून गिरकी मारून नाचणे किंवा अंगठ्यांचा खुळखुळा करून धुपारती म्हणणे, शिकवले जाते. व याच मुलाला 'पोतराज' म्हणून ओळखले जाते. हाच मुलगा पुढे देवऋषीपण सांभाळतो. येसराज म्हणजे महारांना 'राजदंड' वाटत असे याविषयीही बेबीताई तपशिलवार सांगतात.

स्त्रियांची दु:खे, त्यांच्या वेदना, कौटुंबिक कलह, निसर्गाने बहाल केलेले बाळंतपण याविषयीही त्यांनी न लाजता एखाद्या समाजशास्त्रज्ञांच्या पिंडाप्रमाणे लिहिले आहे. मुल जन्माला आल्यावर घरातील माणसांची परंपरा पालनाची अंधश्रद्धा, अज्ञानामुळे आई व मुलांवर केलेले विधी, 'पाच पालव्यांचा नैवेद्य'

म्हणजे रेड्याच्या शरीराचे पाच भाग या सर्वांविषयी वाचूनही किळस येते. पण बेबीताईंनी नि:संकोचपणे याचे वर्णन केले आहे. आषाढातील देवधर्म, रेडेजतरा इ. विषयीही त्या लिहितात, 'रेडेजतरा म्हणजे इंद्राने दिलेले राज्यच' असे त्याचे वर्णन त्या करतात. रेड्याच्या मांसाच्या त्या कालवणाला 'प्लामी', 'पांजी' असे म्हणत. या शब्दांची ओळख बेबीताईंमुळे वाचकांना होते. या अशा बिनशेपटाच्या पशुप्रमाणे जगणाऱ्या या जनावरांना माणसात आणले ते डॉ. बाबासाहेब या महामानवाने म्हणून त्यांच्याविषयीच्या चळवळींचे, परिवर्तनाचे, सभांचे चित्रणही त्या व्यापकतेने करतात. कारण ह्याच सर्वात मोठ्या सांस्कृतिक घटनेमुळे दलितांची अस्मिता जागृत झाली व गुहाजीवन जगणारी ही दलित जनता 'माणसात' आली. धर्मांतर ही घटना दलितांच्या काळ्याकुट जीवनात प्रकाशदायी ठरली. त्यांच्याविषयी कृतज्ञेतेची भावनाही भीमतेजाच्या कवितेच्या रूपाने त्या करतात.

अशाप्रकारे दलित आत्मकथने ही समाजदर्शनाचा व संस्कृतीचा वारसा जपणारी असतात. या विधानाची सत्यता 'जिणं आमुचं' वाचताना येते. महार जीवनाची खरी ओळख, त्यांचे जिणे, त्यांचे शब्द, शिव्या, जाती-गोती, सासू-सून संबंध सवर्णाबरोबरचे समाजातील स्थान या सर्वांची ओळख जिणं आमुचं वाचताना येते. संस्कृती जपणारी कलाकृती म्हणून खऱ्या अर्थाने याकडे पहाता येईल. एका समूहमनाची प्रत्ययकारी कहाणी या दृष्टीने या स्वकथनाकडे पहाता येईल.

BARR. B[illegible] LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

## ४.५ सामाजिक व सांस्कृतिक जाणीव साम्यभेद :

### 'माज्या जल्माची चित्तरकथा' व 'जिणं आमुचं' मधील सामाजिकता व सांस्कृतिकता यादृष्टीने दिसून येणारी साम्य स्थळ :

दलित आत्मकथने ही व्यक्तिमनाने नोंदलेला समूहमनाचा अविष्कार आहे. वरवर पहाता ही व्यक्तिगत दु:खाचा शब्दवेध हुंदका आहे. कारण इतर साहित्यात न आढळणारी 'सामाजिक जाणीव हे दलित साहित्याचे बलस्थळ आहे. यातील 'मी' हा 'आम्ही'चे प्रतिनिधित्व करणारा आहे. 'अस्तित्व' व 'अस्मिता' हे शब्द दलित साहित्यामुळेच उमटू लागला. ह्या आत्मकथनांमुळे एका वेगळ्या उपेक्षित पण करूणेनी भरलेल्या जगाचे जीवन आपल्यासमोर उभे राहिले. दलित लेखकांप्रमाणे दलित लेखिकांनीही आपले अनुभव मांडायला सुरूवात केली. कारण स्त्री ही दलितांतली दलित म्हणून अस्तित्वशून्य आयुष्य जगत होती. ह्याच अस्तित्वशून्य आयुष्यातून भरारी घेतलेल्या स्त्रियांनी परंपरागत जोखड उतरवून ठेवले व हाती 'लेखणी' पकडली. त्यातूनच ही स्वकथने जल्माला आली.

कोणत्याही लेखनामागे मानसशास्त्रीय प्रेरणा असते. मानसशास्त्रात त्याला साहचर्य सिद्धांत असे नांव आहे. मनुष्याच्या अनेक वर्तनव्यवहारामागे या सिद्धांताची प्रेरणा असते. दुसऱ्याचे अनुभव ऐकले अथवा दुसऱ्याच्या अनुभवासंबंधी वाचले की आपलेही तत्सम ततसदृश अनुभव आपल्याला आठवू लागतात. शंकरराव खरातांचे साहित्य वाचून शांताबाईंचे कुतूहल चाळवले. आपल्याजवळहीअसे सांगण्यासारखे खूप आहे. म्हणून आपणही लिहू शकतो असे वाटल्यामुळे शांताबाईंनीही लिहिले. दलित स्वकथनांची निर्मिती अशीच झाली. 'आठवणींचे पक्षी' व 'बलुतं'मुळे अनेक दलित लेखक लेखिकांना लेखनाची, आपले अनुभव

मांडण्याची दिशा मिळाली. दलितांच्या दरिद्री जीवनाचे आणि भुके कंगाल अवस्थेचे चटका लावणारे प्रसंग दलित स्त्रियांच्या आत्मकथनांतून प्रतिबिंबीत झाले आहेत. दलितांच्या वाट्याला आलेली भूक व्यवस्थेची देणगी आहे. एकीकडे सुखाने चैनीसाठी/चवीसाठी खाणारा पांढरपेशी समाज आणि दुसरीकडे कठोर परिभ्रमणानंतरही उपाशी रहणारा दलित समाज, हे दुभंगलेपण समाजाची दोन रूपे स्पष्ट करतात. राबणारा दलित प्रतिष्ठेपासून वंचित आहे. वर्णव्यवस्थेचा तो बळी आहे. गरिबी लादली गेल्यामुळे तो सर्वच पातळ्यांवर अभावग्रस्त जीवन जगतो आहे. गावातून मागून आणलेले शिळेपाके अन्न साठवून ठेवायचे आणि पुरवून पुरवून खायचे, बैलाच्या शेणातील ज्वारी निवडून, धुवून साफ करायची आणि त्याच्या भाकरी करायच्या, बहिणीच्या गावी मौजमजा करायला नव्हे तर पोटाला अन्न मिळेल या आशेने जायचे. अशा कितीतरी घटना 'माज्या जल्माची चित्तरकथा' यात आढळतात. 'भूक' ही या घटनांच्या केंद्रस्थानी आहे. दोन्ही आत्मकथनांत भुकेसाठी झगडणारी माणसे दिसतात, भुकेसाठी सवर्णांची लाचारी करणारी माणसे इथे भेटतात. घोटभर पाण्यासाठी तुकड्यासाठी दिवस दिवस राबणारी, निवडूंगांची बोंडे खाऊन बद्धकोष्ठतेला सामोरे जाणारी, उपाशीपोटी राहिल्यामुळे किड्यांनी वळवळलेली जनावर खाणारी व वेळप्रसंगी काहीच न मिळाल्यामुळे एखाद्या गुराला विषबाधा करून मारणारी आणि त्याच्या मरणावर काही दिवस भूक भागवणारी मंडळीही इथे भेटतात. गुराला विष देऊन मारणे किंवा भाकरीसाठी मंडळीही इथे भेटतात. गुराला विष देऊन मारणे किंवा भाकरीसाठी लाचारी करणे चोरी करणे या गोष्टींचे समर्थन होऊ शकत नसले तरी समाजव्यवस्थेच्या विकृत रेट्यामुळेच या मंडळीना त्या थराला जावे लागत होते.

दोन्ही दलित स्त्रियांच्या आत्मकथनांतून प्रकट झालेले स्त्रीजीवन वेदनेने आणि करूणेने ओथंबलेले आहे हे स्त्री-जीवन अपृश्य समाजातील आहे. दलित स्त्री उच्चवर्णीय समाजाकडून धिक्कारली गेली व स्वसमाजाकडून पिळली गेली. तिचे कुटुंबातील स्थान दुय्यम दर्जाचे आहे. हे स्त्रीजीवन अस्पृश्य समाजातील आहे. दलित स्त्रीला जातीव्यवस्थेमुळे अनेक दु:खाला सामोरे जावे लागलेले दिसले. याची उदाहरणे दोन्ही आत्मकथनांत आढळतात. कुटुंबसंस्थेतील सासू-सूनेचा संघर्ष, सासरच्या मंडळीकडून सुनेला दिली जाणारी वाईट वागणूक आणि मांडलेला छळवाद हा देखील इथे दिसतो. दिवभर रानात काबाडकष्ट करून मोळी विकणारी स्त्री इथे भेटते. तिच्या श्रमाला इथे प्रतिष्ठा नाही. सवर्ण स्त्री दलित स्त्रीचा स्पर्शही खपवून घेत नाही. सवर्ण स्त्री आणि दलित स्त्री या स्त्रिया असूनीदेखील त्यांचा परस्परांकडे पहाण्याचा दृष्टिकोन जातिभावाने प्रेरित आहे. स्त्री म्हणून निसर्गाने तिला बहाल केलेले 'मातृत्व' ही येथील स्त्रियांना दु:खदायक वाटते. दलीत स्त्रियांचे 'बाळंतपण' मोठा 'पण' जिंकल्यासारखेच आहे. त्या मरणप्राय वेदनेतून जगल्या तर पुढील दु:खांना हजर आहेतच. वैद्यकीय उपचार नाही जोडीला अज्ञान यामुळे बाळातपणाच्याय अतोनात वेदना खायला पुरेसे अन्न नाही. याची उदाहरणे दोन्ही आत्मकथनांत दिसतात. शांताबाईंच्या आत्मकथेतही याचे उदाहरणआहे. तसेच बेबीताईंनीही याचे विदारक चित्र मांडले आहे. बाळंत झालेल्या रिकाम्या पोटात अन्न नाही म्हणून दलित स्त्री ते पोट फडक्याने बांधून ठेवते. यासारे विदारक समाजव्यवस्थेचे बळी पडलेले, मानवी रूप या दोन्ही आत्मकथनांत दिसते.

जेथे अज्ञान असते तेथे अंधश्रद्धा असतेच. दलित समाज वर्षानुवर्षे अंधश्रद्धांचे, रूढींचे पालन करत होता. आषाढातले देव, पोतराज पद्धत, तराळकी,

जत्रा, अंगात येण्याचे प्रसंग, देवऋषींचे उपाय, अज्ञानापायी वैद्यकीय उपचार नाकारण्याची मानसिकता दोन्ही ठिकाणी दिसते. दोन्ही 'कांबळे बाईंनी' लहानपणापासून या अंधश्रद्धेला, रूढींना फार जवळून पाहिले. त्याचे अनुभवही फार जवळून घेतले. म्हणून दोघींच्या आत्मकथनांत याचे संदर्भ सापडतात. बाळंतिणीचा रेड्याच्या शरीराचे भाग देणे म्हणजे 'पाच पालव्यांचा नैवेद्य' यांचे उल्लेख दोघींनीही केले आहेत. त्या दिवशी म्हैस, रेडा मेला नसेल तर बाळंतिणीच्या पाचव्या दिवशी तो मुद्दा मारला जाई. रूढींचे पालन, संस्कृतींचे पालन ही दलितांची मानसिकता वर्षानुवर्षे सुरू होती. दलित समाज अस्पृश्यतेच्या व रूढींच्या विळख्यात अडकला होता. त्यातून बाहेर पडण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांसारख्या महामानवाला जन्म घ्यावा लागला. म्हणून त्यांच्याविषयी कृतज्ञता, त्यांच्या सभांचे, चळवळींचे उल्लेख दोन्हीमध्ये आढळतात. त्यांनी सांगितलेले शिक्षणाचे महत्त्व अमलात आणल्यामुळेच दलितांना जीवनदान मिळाले. म्हणून शिक्षणाविषयीदोन्ही आत्मकथनांत जिव्हाळा दिसतो. दोघींनीही प्रतिकूल परिस्थितीत शिक्षण घेतले. अंगावर पुरेसे वस्त्र नाही व खायला पोटभर अन्न नाही तरीही दोघी शिकल्या. हे फुले, आंबेडकरी चळवळीचे यश म्हणता येईल. शांताबाईंनी तर एका मजुराची सातवी शिकलेली मुलगी असूनही शिक्षणक्षेत्रात मानाचे स्थान मिळवले.

दलित स्त्रियांच्या आत्मकथनांत त्यांच्या पतीविषयी फार थोडी माहिती मिळते. त्यांचे वैवाहिक जीवन त्या सखोलपणे चित्रितकरत नाहीत. शांताबाईंच्या लेखनातही फार अल्प माहिती मिळते. बेबीताईंच्या लेखनात नाममात्रही उल्लेख नाही. कोणत्याही आत्मचरित्रकाराच्या आत्मचरित्रातून त्यांच्या जीवनाचा परिचय

होतो तसेच त्यांच्या सभोवतालच्या समाजाचा व संस्कृतीचाही होतो. त्याचेच प्रत्यंतर दोन्ही आत्मकथनांतून मिळते. दलित स्त्रीजीवन व दलित समाजजीवन आपल्या स्वकथनाच्या अनुषंगाने सांगणे आवश्यक असल्यामुळे त्यांनी कुटुंबाविषयी फार थोडी माहिती दिली आहे. 'कुटुंब' हे समूहालाच मानले गेल्यामुळे 'स्व' च्या आठवणीबरोबर स्वसमाजही यात दिसून येतो. येथील स्त्रीजीवन व दलितजीवन चित्रित करणे हा हेतू दिसून येतो. अनेक शब्दबद्ध म्हणी, महारजीवनातील प्रथा, परंपरा त्यांचे सण, अठराविश्व दारिद्र्य, दारिद्र्याने पिचलेली मुलं, माणसं, स्त्रिया, त्यांची व्यथा कथा मांडणे हा प्रमुख हेतू दोन्ही आत्मकथनांत दिसतो.

## 'जिणं आमुचं' व 'माज्या जल्माची चित्तरकथा' : सामाजिक व सांस्कृतिक दृष्ट्या असलेला भेद :

'माज्या जल्माची चित्तरकथा' हे 'शांताबाई कृष्णाजी कांबळे' यांचे पुस्तक १९८६ साली पुस्तकरूपाने प्रसिद्ध झाली. या पुस्तकाचे महत्त्वाचे वैशिष्ट्ये म्हणजे लेखिकेने केलेले हे लेखन सेवानिवृत्तीच्या काळात केले आहे. सेवानिवृत्तीचा काळ हा एकापरीने अन्वर्थक काळ असतो. जीवनातील कर्तृत्त्वाचा काळ संपत आल्याचे ते द्योतक असते जीवनाचा उर्वरित काळ, जीवनाचे इतिकर्तव्य जीवनाचे साफल्य अथवा वैफल्य, समाधान अथवा असमाधान इत्यादींच्या सोबत काढायचा काळ असतो. म्हणून या काळात माणूस मागे वळून आपल्याच आयुष्याच्या वाटचालीकडे बघतो. म्हणून आत्मचरित्र या वाङ्मयलेखनाचा संकेत असा आहे की, ते आयुष्याच्या उत्तरार्धात लिहिले जाते. दलित आत्मकथने मात्र वयाच्या तिशी पस्तीशीत लिहिली जातात. या अर्थाने शांताबाईंचे आत्मचरित्र खऱ्या अर्थाने आयुष्याच्या संध्याकाळी लिहिले आहे.

शांताबाईंच्या आत्मकथनांत कालानुक्रमाचे सूत्र आहे. बालपण, शिक्षण, नोकरी, विवाह, संसार या क्रमाने ते उलगडत जाते. त्यामुळे एकप्रकारची पूर्णता त्यात आहे. शांताबाईंचे आत्मकथन वाचले असता असे लक्षात येते की, समाजव्यवस्थेने व कुटुंबव्यवस्थेने गुहाजीवन लादलेले असताना, अनेक पातळीवर संघर्षरत दिसणारी ही स्त्री आपल्यावरील गुलामगिरीचेजोखड उतरवून ठेवते व आपल्या कुटुंबाचा विकास घडवून आणून केवळ दलितच नव्हे तर दलितेतर स्त्रियांनाही आपला आदर्श घ्यायला भाग पाडते. त्या अर्थाने एका अर्थी एका दलित लेखिकेची जीवनाची पूर्णता दाखवणारी कहाणी आहे. 'स्वकेंद्र' ही महत्त्वाची जाणीव वाटल्यामुळे शांताबाई यांच्या आत्मकथनांत 'सामाजिक जाणीव' प्रकर्षाने दिसत नाही. समाज व संस्कृती याविषयीचे संदर्भ त्यांच्या आत्मलेखनात आठवणींच्या ओघाने येतात. त्यामुळेच इतर आत्मकथनांत आढळणारा प्रक्षोभ, विद्रोह त्यांच्या आत्मकथनांत आढळत नाही. तर कमालीचा शांतपणा व संयमीपणा आढळतो. धर्मांतर, बौद्धधर्म, त्यामुळे आलेले परिवर्तन, आंबेडकरी चळवळीचा प्रसार इ. मोठमोठ्या सांस्कृतिक व राजकीय घटना घडूनही त्यांचा नाममात्र उल्लेख त्यांच्या लेखनात आढळतो. कारण त्यांना घटनांना केंद्रस्थानी ठेवून आपले 'स्वकथन' करायचे नव्हते तर आपल्या कथनांच्या ओघात यांचा संदर्भ द्यायचा होता. म्हणूनच त्यांची कहाणी म्हणजे एका दलित स्त्रीच्या संघर्षाची कहाणी वाटते.

'जिणं आमुचं' या पुस्तकात बेबीताईंनी आपल्या समाजाच्या 'व्यथा' मांडल्या आहेत. महार समाजाचे व संस्कृतीचे चित्रण महत्त्वाचे मानल्यामुळे त्यांनी 'स्व' ला दुय्यम स्थान दिले आहे. दलित आत्मकथनांत असलेली 'दलित जाणीव' प्रामुख्याने बेबीताईंच्या लेखनात आढळते. इतर दलित आत्मकथनांपेक्षा ते काहीसे

वेगळे आहे. कारण वैयक्तिक चित्रणपेक्षा त्यांच्या समाजाविषयी अधिक ज्ञान आपल्याला मिळते. 'समूहवेदना' बेबीताईंच्या आत्मचरित्रात दिसून येते. कारण स्व आठवणींना उजाळा देण्यापेक्षा समाजाचे भोगवटे चित्रित करण्यात त्यांना अधिक स्वारस्य आहे. दलित स्त्रीची व्यथा वेदना सवर्ण समाजापुढे यावी, त्यांनी वर्षानुवर्षे केलेल्या अन्यायाविषयी त्यांना शरमिंदे करावे त्याचबरोबर आजच्या दलित समाजातील पिढीला पेन्नास वर्षापूर्वीचेमहारांचे 'जिणे' कळावे या हेतूने त्यांनी हे लेखन केले आहे.

सामाजिकतेच्या व सांस्कृतिकतेच्या दृष्टीने विचार करता शांताबाईंच्या आत्मलेखनापेक्षा बेबीताईंच्या लेखनात महार संस्कृती तपशीलवारपणे उभी राहिलेली पहायला मिळते. महार समाजाच्या संस्कृतीतील अनेक संदर्भ बेबीताईनी बारकाईने टिपले आहेत. दलित स्त्रीचे जीवन किती केविलवाणे होते व कुटुंब व समाज या दोन्ही पातळीवर तिचे अस्तित्व नाकारले गेले होते याचा अनुभव संपूर्ण आत्मकथन भर येत रहातो. सहाजिकच बेबीताई एक स्त्री असल्यामुळे त्यांनी हे सर्व जवळून पाहिले व स्त्रीची वेदना अनुभवली. त्यामुळेच एकप्रकारचा कडवडपणा व विद्रोही स्वर त्यांचा सवर्णाविषयी दिसून येतो. सवर्ण स्त्री विषयी आरोपीची भूमिका त्या घेताना दिसून येते. शांताबाईंनीही तेच अन्याय सोसले, तीच सवर्णांची मानसिकता पाहिली पण त्यांनी विद्रोहाची भूमिका घेतली नाही. कारण त्यांना 'स्वआठवणींना' उजाळा देणे ही आत्मचरित्राची खरी सिद्धता करायची होती.

ज्या महामानवाने दलितांच्या जीवनात परिवर्तन घडवून आणले त्यांच्याविषयी कृतज्ञता आणि नितांत आदर बेबीताईंनी आपल्या आत्मकथनांत व्यक्त केला आहे. सवर्णाबरोबर स्वसमाजालाही फटकारण्याची वृत्ती इतर

आत्मकथनांत आढळत नाही. ती बेबीताईंच्या आत्मकथनात आढळते. कारण प्रबोधनाची भूमिका घेण्याबरोबरच आपला समाज पुढे याचा ही तळमळीची इच्छा त्यांची आहे. आपल्या समाजाचे अपार दारिद्रय, अंधश्रद्धा आणि धर्मभोळेपणा, अज्ञान, एकूण लाचार अवमानित जगणे त्या साकारतात. कारण त्यांना स्वसमाजाविषयी तळमळ आहे. म्हणूनच स्वसमाजालाही प्रसंगी कठोर बोल द्यायला त्या कचरत नाहीत. दलित समाजाचे सुरवातीचे भीषण चित्र व आंबेडकरी चळवळीनंतर आलेले परिवर्तन यांचा सुयोग्य मेळ त्यांच्या आत्मकथनांत आढळतो.

त्यादृष्टीने विचार करता शांताबाईंनी प्रत्येक अनुभव 'स्व'ला केंद्रस्थानी ठेवून केल्यामुळे एकप्रकारचा तटस्थपणा समाजाविषयीच्या बदलाविषयी दिसून येतो. एका अलिप्त व शांतवृत्तीने त्यांनी या बदलांविषयी नोंद केलेली दिसते. म्हणून बेबीताईंच्या आत्मकथनाविषयी असे म्हणता येईल. त्यांनी केलेले स्वविषयीचे चित्रण निमित्तमात्र आहे. बाकी जे लिहावयाचे आहे सांगावयाचे आहे ते आपल्या समाजाविषयी समाजाचे चित्र रेखाटताना अपातत: जेवढे आणि जे येईल तेवढेच स्वत:विषयी असेल आणि येथे त्यांचा हेतू साध्य झाला आहे. म्हणून स्वमाजाविषयी असो अथवा सामाजिक राजकीय घटनेविषयी असो, त्यांची स्पंदने ही 'स्व'पेक्षा वरचढ ठरली आहेत. 'आम्ही'च्या प्रबळ भक्तिमुळेच बेबीताईंचे आत्मकथन सामाजिक व सांस्कृतिक पातळीवर निश्चितच वरचढ ठरले आहे. दलित समाजाचा व संस्कृतीतचा काव्येतिहास मांडणारे आत्मकथन म्हणून त्यांचे महत्त्व अधिक आहे.

### ४.६ भाषाशैली आणि निवेदनशैली :

दलित लेखकांच्या बरोबरच काही दलित लेखिकाही आपल्या आत्मकथा सांगण्यासाठी सरसावू लागल्या आणि दलितांतील दलित म्हणून असलेले स्त्रीचे

दु:ख मराठी साहित्य विश्वात येऊ लागले. दलित कुटुंबातील एक घटक म्हणून तिच्या वाट्याला येणारे जगणे समजून घेण्यासाठी या दलित लेखिकांची आत्मकथने महत्त्वाची आहेत. एक स्त्री म्हणून इतर दलितेतर स्त्रियांपेक्षा तिचे दु:खभोग वेगळे आहेत.

'जिणं आमुचं' आणि 'माज्या जल्माची चित्तरकथा' या दोन्ही आत्मकथनांचा अभ्यास केला असता काही गोष्टी लक्षात येतात. त्या म्हणजे सगळीकडे दलित स्त्रीचे दु:ख तेच आहे. पण त्या दु:खाकडे बघण्याची प्रत्येकीची वृत्ती निराळी आहे. शांताबाईंनी आपल्या वाट्याला जे दु:ख आले ते निमूटपणे न सोसता आपल्या प्रतिकूल परिस्थितीवर मात करत ज्याच्यावर सवर्णांची मिरासदारी होती त्या शिक्षणक्षेत्रात आपले स्थान अत्युच्च पदापर्यंत दाखवले. बेबीताईंच्या आत्मकथनांत 'स्व' बद्दल नाममात्र उल्लेख असल्यामुळे त्यांचा शैक्षणिक स्तर लक्षात येत नाही पण ज्या अभ्यासूवृत्तीने त्यांनी आपल्या समाजाचे चित्रण रेखाटले आहे त्यावरून एक गोष्ट लक्षात येते की, महात्मा ज्योतीबा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर या महान प्रभुतीमुळेच या तळागाळातल्या स्त्रिया आपले अनुभव शब्दबद्ध करू शकल्या. या दृष्टीने विचार केला तर 'शांताबाई कांबळे' यांचे 'माज्या जल्माची चित्तरकथा' हे आत्मचरित्र प्रांजळ निवेदनामुळे लक्षवेधी ठरले आहे. यातील विचारांची पारदर्शकता आणि वृत्तीचा प्रामाणिकपणा नजरेत भरणारा आहे. 'जमेल तसे लिहिले' अशी शांताबाईंची भूमिका दिसते. या आत्मचरित्राला कालानुक्रमाचे सूत्र दिसते. बालपण, शिक्षण, नोकरी, विवाह, संसार अशा क्रमाने ते उलगडत जाते. शांताबाईं व्यवसायाने शिक्षिका असल्या तरी त्यांना समाज 'मागासवर्गीय शिक्षिका' म्हणूनच स्वीकारतो. त्यावेळी सोसावी लागलेली मानहानी अपमान

चित्रित करताना त्यांनी निवेदनात कडवटपणा येऊ दिला नाही. भावविवशता टाळली. सहानुभूती मिळविण्याचा प्रयत्न केला नाही. त्यांनी पत्करलेला शिक्षकीपेशा उदरनिर्वाहासाठी सहाय्यभूत ठरला तरी त्यामुळे त्यांची जीवनदृष्टी तयार झालेली दिसते. त्यामुळेच आत्मभान, ध्येयवाद, सत्यप्रियता, संयम यांचे प्रतिबिंब त्यांच्या लेखनात दिसते. पदरी असलेल्या दु:खामुळे त्यांची वृत्ती सोशिक व संयमी झालेली दिसते. आत्मकथेपेक्षा त्यांची जीवनाकडे बघण्याची वृत्ती मनस्वी झालेली दिसते.

शांताबाईंच्या निवेदनात सहजता आहे. त्यांची अल्पाक्षरी भाषा लहान सहान वाक्यातून खूप काही सांगणारी आहे. सांगली परिसरातील भाषेचा केलेला वापर सुरूवातीला दिसून येतो. पण शिक्षणामुळे दलितांच्या सांस्कृतिक स्तर बदलतो अन् व्यवसायामुळे दलितांचाबदलाते. शांताबाईंच्या जीवनाच्या पूर्वार्धातील अनुभव त्यांनी ग्रामीण महारी भाषेत कथन केले आहेत. संवाद हे माध्यम अतिशय समर्थपणे वापरले आहे. विशेषत: माणदेश परिसरातील ग्रामीण व महारी भाषेतील संवाद लक्षणीय व नाट्यपूर्ण आहेत. उदा. 'त्यांनी आमालाबाहीर बसवलं. ते आमाला शिवून घेत नव्हतं. आये मास्तपण माणूस हाय, मग मास्तर कसा आपल्याला शिवून घेत नाय ? ही गोष्ट माझ्या मनाला लागून राहिली होती.'[१४] (पृ. ९३) अल्पाक्षरी भाषा, लहानसहान वाक्ये, मुक्तछंदाप्रमाणे गद्यलेखनातही वाक्यरचनात मुक्तशैली इत्यादींचा वापर त्यांनी केला आहे. जसजसे लेखिकेच्या जीवनाच्या उत्तरार्धातील अनुभव कथनाकडे येतो तसतसे कथन प्रादेशिक बोलीभाषेचा परिवेश सोडून, नागरी भाषेचा परिवेश धारण करताना दिसते. साहित्य हा भाषिक व्यवहार आहे. बालपणात घडलेल्या घटनेचे वर्णन प्रौढपणी करताना त्यावर भाष्य करण्याचा मोह लेखकाला स्वाभाविकपणे आवरता येत नाही. परंतु शांताबाईंनी असा मोह टाळलेला

आहे. त्यामुळे प्रसंगवर्णनात अनुभवकथनात कोठेही अप्रस्तुत तपशील येत नाही. तसाच पाल्हाळही येत नाही. मग एखादे व्यक्तिवर्णन असले तरीही हा संयम लेखिकेने पाळलेला आहे. कोणतेही भाष्य तपशिलवार वर्णन अथवा विशादीकरण न करता लेखिका आठवणीतला प्रसंगाला, अनुभवाला सरळसरळ सामोरी जाते. कथनाची शैलीच अशी वाटते की लेखिका तिचे अनुभव अलिप्तपणे कथन करते पण वाचक मात्र त्या अनुभवात लुप्त होतो.

कार्ल मार्क्सने सांगितले होते की, जन्माला येणारा माणूस परिस्थितीची निवड करू शकत नाही. परंतु परिस्थितीत बदल घडवून आणू शकतो. शांताबाईंनी तेच केले त्यांनी आपल्यापुरती ही परिस्थिती बदलली व आपल्याबरोबर आपल्या मुलांनाही भौतिक अभ्युदयाची दिशा दाखवली. त्या सेवानिवृत्त झाल्या तेव्हा मनाने शांत, समाधानी होत्या. त्या शांत अवस्थेत त्यांनी हे आत्मकथन लिहायला प्रारंभ केला. त्यामुळे प्रक्षोभ, विद्रोह, खवळणं याची प्रचिती त्यांच्या लेखनातून येत नाही. थोडक्यात सेवानिवृत्तीच्या काळत हे लेखन केल्यामुळे त्यांनी आपल्या जीवनक्रम सुनियोजितरित्या मांडला. जन्म, शिक्षण, विवाह, सेवानिवृत्ती या सगळ्या कालक्रमात त्यांनाही दुःख, दारिद्र्य, अंधश्रद्धा, अज्ञान, सवर्णांचा अन्याय सहन करावा लागला. पण ह्या घटना त्यांनी तपशीलवार न मांडता, आपल्या आयुष्यक्रमाशी निगडीत आल्या म्हणून मांडल्या. सामाजिकतेशी व सांस्कृतीकतेशी संबंधित घटनांचे चित्रण त्यांनी अगदी तटस्थपणाने मांडले. कुठेही विद्रोहाची, प्रबोधनाची भाषा आढळली नाही. त्यामुळे इतर आत्मकथनांप्रमाणे सामाजिक सांस्कृतिकदृष्ट्या त्यांच्या आत्मकथनाचा विचार करता येत नाही. तरीही पन्नास वर्षापूर्वी एका दलित स्त्रीने शिक्षण घेऊन प्रतिकूल प्रतिकारात्मक स्थितीत शिक्षण

क्षेत्रात अधिकारपदापर्यंत मजल मारणे निश्चितच कौतुकास्पद आहे. त्या दृष्टीने विचार करता ही एका दलित स्त्रीच्या जीवनसाफल्याची कहाणी आहे.

'बेबीताई कांबळे' यांच्या 'जिणं आमुचं' या आत्मकथनांत विवचेनाच्या सोयीसाठी प्रकरणे असावी असे वाटते. कारण इतर आत्मकथनांप्रमाणे त्यात कालक्रम व्यक्त झालेला नाही. प्रारंभी जन्म, बालपणाचे चित्रण असले तरी पुढे कालक्रमानुसार तपशील येत नाही. 'स्व' विषयी बेबीताई बेताचाच मजकूर लिहितात. कारण 'स्व' पेक्षा स्वसमाजाचे चित्रण त्यांना अधिक ग्राह्य वाटते. 'जिणं आमुचं' या बेबीताईंच्या शीर्षकातच सामूहिकता असल्यामुळे सामाजिक प्रयोजनाच्या दृष्टीने यातील समूहवेदना प्रबळ वाटते. एकंदरीत दलित नायक नायिका प्रस्थापित समाजाविरूद्ध बंड करून उठलेले आढळतात. कथा समुदायांचे आस्तित्व या समाजव्यवस्थेने नाकारले. त्या नायकनायिकांचे संवेदनविश्व गुदमरल्यासारखे झाले. म्हणून या व्यवस्थेविरूद्ध या नायक नायिकांनी सुप्त बंडखोरी आणि नकार नोंदविला. बेबीताईंही याला अपवाद नाहीत. सवर्णांचा अन्याय नोंदविताना त्यांची भाषा कडक बनते. त्या विद्रोहाची भाषा बोलू लागतात. एखाद्या प्रबोधनकाराप्रमाणे सवर्णांची कानउघडणी करतात. बेबीताईंच्या आत्मकथनांतून सर्वसामान्य पांढरपेशा लोकांना अपरिचित असलेले अनुभवविश्व प्रकट झालेले आहेत. जे दलित स्त्रीचे जीवन आणि महार संस्कृती बेबीताईंनी चित्रित केली त्यातून त्यांची मार्मिक वृत्ती व सूक्ष्म निरीक्षणशक्ती दिसून येते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे ओजस्वीपण त्यांनी जागोजागी मान्य केले आहे. 'शील', 'सत्त्व', 'नीती' या तीन रत्नांच्या थरात मानवजात नांदताना बघायची बाबासाहेबांची प्रबळ इच्छा होती. ते स्वप्न पूर्ण करण्याचे आवाहन त्या दलित नवपिढीला करतात हे वेगळेपण त्यांच्या लेखनाचे आहे.

भारतीय वर्णाधिष्ठित समाजव्यवस्थेतील अध:स्तरावरील प्रत्येक जनजातीत फुले आंबेडकरांच्या विचारसरणीमुळे जी जागृती आली याचे उदाहरण म्हणजे एक अद्य:स्तरावरील स्त्री आपले अनुभव मोकळेपणाने मांडू शकली. हे या आत्मकथनाचे वैशिष्ट्य आहे. म्हणून त्यांच्या लेखनाच्या मानसिकतेची सुरूवात बाबासाहेबांच्या विचारांनी होते व शेवटही फुले आंबेडकर यांचा विचारांचा पार्श्वभूमीने होतो. आपणही आपल्या समाजाच्या दु:खाबद्दल काहीतरी लिहिले पाहिजे या मानसिक उर्मीतून त्यांनी हे लेखन केले आहे. सामुहिक वेदनेच्या प्रेरणेतून त्यांनी लेखन केल्यामुळे व अद्य:स्तरावरील जो सांस्कृतिक, सामाजिक स्तर त्यांच्या दलित म्हणून वाट्याला आल्यामुळे त्यांची भाषा कडक व विद्रोही बनलेली दिसते, त्याचबरोबर बेबी कांबळे यांच्या भाषेत कारूण्य, मिश्किलपणा, उपहास भाष्य यांचे बेमालूम मिश्रण आढळते. उदा. 'लुगडं लेकीजवळ, सुनेजवळ धुण्यासं द्यावं. त्याला म्हणतानी लुगडं म्ळणायचं, नाहीतर चक्क तिरंगा झेंडाच ! तो एका धडक्याला तीन चार धडकी जोडून तयार केलेले महावस्त्रचं असे'[५] (पृ.९६) किंवा 'महारांची येस्करांचीकाठी म्हणजे महारांना राजदंड वाटावा अशी भुलवण समाजाने केलेली',[६] (पृ.९७) दलित आत्मकथनांत आढळणारी समूहनिष्ठा इथे प्रकर्षाने जाणवते. केवळ एका व्यक्तीची जीवनकहाणी मांडणे हा हेतू नसून स्वसमाजाच्या सुखदु:खाचा पाढा वाचून दाखवणे हा व्यापक हेतू त्यात आहे. म्हणून जातिव्यवस्थेसंबंधी, विशिष्ट समाजाच्या मानसिकतेविषयी व देवधर्माविषयीही त्यांची भाषा उग्र बनते.

बेबीताईंची निवेदनशैली ही लेखनानुमामी असण्यापेक्षा कथनानुगुमी अधिक आहे. कथनाचा तिला बाज आहे. ग्रामीण दलितांच्या बोलीचा अकृत्रिमता त्यांनी सहजपणे वापरली आहे. दलितांच्या जीवनातील नित्याच्याच प्रसंगातून त्यांचा जीवनातील अपार कारूण्य व दास्य त्यांनी चित्रित केले आहे. कारूण्य, उपहास, दु:ख, वेदना, विद्रोह, संघर्ष याचे बेमालूम मिश्रण त्यांच्या निवेदनात आढळते.

एकप्रकारे निबंधाचे स्वरूप याला प्राप्त झाले आहे असे वाटते. ओघवती व प्रभावी भाषाशैली हे त्यांच्या आत्मकथनाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. बेबीताईंनी अभिव्यक्तिसाठी सातारा परिसरतील बोलीचा वापर केला आहे. समाजशास्त्रीय दृष्ट्या व सांस्कृतिक दृष्ट्या या आत्मकथनाला महत्त्वाचे स्थान आहे. प्रसंगी कलात्मकतेकडे दुर्लक्ष झालेले दिसले तरी दलित जीवनोच व संस्कृतीचे एवढे एकत्रित चित्रण क्वचितच पहायला मिळेल. त्यादृष्टीने त्याचे स्थान इतर दलित स्त्रियांच्या आत्मकथनापेक्षा मोठे आहे.

## ४.७ सारांश :

दलित स्वकथनांतून दलित लेखक व लेखिकांना जे वास्तव साकारायचे होते ते वर्षानुवर्षे वर्णव्यवस्थेने, परंपरेने गाडून टाकलेले होते. ज्यावेळी लेखणीचे सामर्थ्य या तरूण तरूणींना मिळाले त्यावेळी अनेक प्रक्षोभक, स्फोटक 'स्वकथने' निर्माण होऊ लागली. ज्ञानेश्वरांपासून सुरू झालेल्या साडेसातशे वर्षाच्या दीर्घ साहित्यपरंपरेत दलितांचे जीवनानुभव अभावानेच व्यक्त झालेले आढळतात. म्हणजे साहित्याच्या दृष्टीने दलितांचे जीवनानुभवही बहिष्कृत होते. म्हणूनच ज्यावेळी प्रकटीकरणाला दिशा मिळाली तेव्हा नकार, विद्रोह, संघर्ष ह्या स्थायी भावासकट ही स्वकथने निर्माण झाली. हे दु:ख त्यांचा वैयक्तिकतेपासून सुरू होऊन सामाजिकतेपर्यंत थांबते. म्हणून उपस्थित सर्व दलित साहत्यात 'दलित स्वकथने' सर्वात सकस वाटतात. वाङ्मयीन दृष्ट्या ती मोलाची ठरतात. या दोन्ही आत्मकथनांचा अभ्यास करताना याची जाणीव प्रकर्षाने झाली.

----

## संदर्भ सूची


१) कांबळे, शांताबाई, 'माज्या जल्माची चित्तरकथा', पृष्ठ क्र.१५६.

२) कांबळे, शांताबाई, 'माज्या जल्माची चित्तरकथा', पृष्ठ क्र.१५६.

३) कांबळे, शांताबाई, 'माज्या जल्माची चित्तरकथा', पृष्ठ क्र.१५५.

४) कांबळे, शांताबाई, 'माज्या जल्माची चित्तरकथा', पृष्ठ क्र.९३.

५) कांबळे, शांताबाई, 'जिणं आमुचं', पृष्ठ क्र.९६.

६) कांबळे, शांताबाई, 'जिणं आमुचं', पृष्ठ क्र.९७.


-----